# श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यास, (प्रभादेवी), मुंबई

## अभिव्यक्ती स्वारस्य (Expression of Interest) मागविण्याबाबतची सूचना

**विषय :–** श्रीं च्या दर्शनासाठी मंदिरात येणाऱ्या भाविकांसाठी रांग व्यवस्थापन (Queue Management) करण्याबाबत.

श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिरात दररोज हजारो महिला व पुरूष भाविक श्रीं च्या दर्शनासाठी येतात. मंगळवार, सार्वजनिक सुट्टया, शनिवार, रविवार, संकष्टी या दिवशी ती संख्या लाखोच्या घरात जाते. श्रीं च्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना अधिक सुलभतेने व विनायास दर्शन देण्याच्यादृष्टीने रांग व्यवस्थापनेमध्ये बदल करण्याचे प्रस्तावित आहे. या अनुषंगाने नामांकित आर्किटेक, क्यू मॅनेजमेन्ट कन्सल्टंट यांच्याकडून न्यासासाठी रांग व्यवस्थापन (Queue Management) आराखडा तयार करण्यासाठी **अभिव्यक्ती स्वारस्य** (Expression of Interest) मागविण्यात येत आहे.

२. **रांग व्यवस्थापन कामाची व्याप्ती (Scope of Work) खालील प्रमाणे आहे :–**

१) सध्या अस्तित्वात असलेली रांग व्यवस्थेची प्रत्यक्ष पहाणी करून त्याचा अभ्यास करणे. हा अभ्यास करताना आठवडयाच्या सातही दिवशी दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची संख्या विचारात घेणे. शनिवार, रविवार, सार्वजनिक सुट्टया व संकष्टी चतुर्थी इत्यादी गर्दीच्या दिवशी भाविकांची संख्या जास्त असते.
२) सध्याच्या रांग व्यवस्थेमध्ये असलेल्या त्रुटी, अडथळे जाणून देण्याच्यादृष्टीने न्यास व्यवस्थापन समिती सदस्य, न्यास अधिकारी व सुरक्षा अधिकारी यांचे अनुभव /विचार जाणून घेणे.
३) सध्याच्या रांग व्यवस्थेचा अभ्यास करण्याच्यादृष्टीने त्याचे फोटोग्राफस्, व्हीडीओ शुटींग करणे.
४) रांग व्यवस्थेचा अभ्यास करून Conceptual flow of queue बाबत पर्याय (Options) सूचविणे.
५) पर्यायांचे (Options) चे Walkthrough Presentation तयार करणे.
६) न्यास व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने पर्यायापैकी एक पर्याय निश्चित करून त्या अनुषंगाने अंतिम आराखडा सादर करणे.

३. इच्छूक नामांकित आर्किटेक, क्यू मॅनेजमेन्ट कन्सल्टंट यांनी **सोमवार, दि. ४ जून, २०१८ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यत** आपल्या कंपनीचा प्रोफाईल तसेच या कामाच्या आर्थिक देकारासह आपले **अभिव्यक्ती स्वारस्य** (Expression of Interest) सीलबंद लिफाफ्यात सादर करावे.

(स्वाक्षरी)

( संजीव पाटील )
कार्यकारी अधिकारी